

# ॥ श्रीदत्तात्रेय स्तोत्र ॥


लेखक : विष्णु गोपाळ नातू

सप्रेम भेट

# प्रस्तावना

सदर श्रीदत्तात्रेय स्तोत्र पुस्तिका स्व. विष्णु गोपाळ नातू मु. पो. आजगांव ( सावंतवाडी ) यांच्या हस्ते लिखित असून त्याची प्रथमावृत्ती १९६८ साली प्रकाशित झाली होती. त्यानंतर सदर आवृत्तीची मूळ प्रत, प्रतीचा ढांचा न बदलता आहे त्या स्वरुपातच ठेवून पुर्नप्रकाशित केली आहे.

प्रत्येक चांगल्या कार्यामागे सतत एक प्रेरणा कार्यरत असते. त्यानुसार आमच्या आजोबांकडून (स्व. विष्णु गोपाळ नातू) श्रीदत्तात्रय स्तोत्र या सुरस ग्रंथाची निर्मिती होऊन पहिली आवृत्ती १९६८ साली प्रकाशित झाली. प्रथम आवृत्तीचेवेळी (स्व.) गोविंद विष्णु व श्रीमती गीता गोविंद नातू यांचे लेखन कार्यात खूप सहकार्य झाले. या पूज्य ग्रंथ आवृत्तीचे पुन:प्रकाशन नव्या रुपात श्री दत्त जयंतीला दि. १४ डिसेंबर २०२४ पुर्नप्रकाशित करताना अत्यंत आनंद होतो आहे.



# श्रीदत्तात्रेय स्तोत्र.

किंमत ३ आणे.

( ८३ तिकिटें पाठविणें. बुकपोस्टानें पाठवूं. )

## ॥ श्रीसद्गुरु दत्तात्रेयायनमः ॥

श्रीगणेशायनमः ओंकाररूपागजानना । भावें करीं तुह्मां नमना ॥ दाखवा आपुली करुणा । पाळा सर्वांस प्रेमानें ॥ १ ॥ थोडक्यांत श्री दत्त स्तुती । कराया तेचि आज्ञा देती ॥ तुह्मी दोघे एक निश्चितीं । कार्य असे तुमचेंच ॥ २ ॥ सर्वदा सुकृपा ठेवावी । अशी विनंति करी कवी ॥ श्री गणपतीही बरवी । आशिर्वादें कृपा करिती ॥ ३ ॥ आतां नमूं शारदा माता । वाणी रूप माया तत्वतां ॥ तिजसी नमन करितां । आशिर्वाद प्रेमें दे ॥ ४ ॥ आदि तत्त्व जें ब्रह्मनाम । सर्वाधार तेंच परम ॥ सकळांचें आद्यंत धाम । तें उत्तम नामिताहें ॥ ५ ॥ तें उत्पन्न करी जी माया । उत्सुक मी तिला नमाया ॥ प्रत्येक जणा आत्म ठाया । नेई माते कृपेनें ॥ ६ ॥ सकळ विश्व तुतां केलें । दृश्य

अदृश्य वें सगळें ॥ अज्ञानरूपी मायाजाळें । घालिसी तूं जीवांवरी ॥ ७ ॥ परी तुजसी जे शरण । त्यांसी करिसी ब्रह्मीं लीन ॥ तरी सुखानें सुख पूर्ण । देई माये दयाळे ॥ ८ ॥ तुजपासून विश्वजाण । ह्मणुनि आई तुवां जाण ॥ तव कृपा असूं दे पूर्ण । माता ह्मणे तथास्तु ॥ ९ ॥ मायेपासून महाविष्णू । अहंकारास नाम विष्णु ॥ ब्रह्मांडीं तसा देहीं विष्णु । प्रत्येकाच्या रहातसे ॥ १० ॥ विष्णूपासून ब्रम्हदेव । त्याच्यापासून महादेव ॥ ब्रह्मा विष्णु महेश सर्व । जे आधार जगताला ॥ ११ ॥ मुख्य सत्त्व गुण विष्णूंत । मुख्य रजगुण विधींत ॥ मुख्य तम गुण शिवांत । नमितों त्यांसी आदरें ॥ १२ ॥ यांच्या शिवाय कांहीं नाहीं । विचार कराहो सर्वहीं ॥ चंद्र सूर्य तारागणही । यांच्यापासून उत्पन्न ॥ १३ ॥ जसा देह तसें ब्रह्मांड । असें जाणावें

हो अखंड ॥ शरीर लहान ब्रह्मांड । विचारानेंही कळेल हें ॥१४॥
असा आपुला नरजन्म । त्याचें जाणावें मुख्य कर्म ॥ आपलें
घर असे ब्रह्म । त्यांत लीन होण्याचें ॥ १५ ॥ कर्माधीन सकळ
जीव । देवही मानव दानव ॥ ब्रह्मीं विलीन होई जीव । मगतो
मुक्त जाहला ॥ १६ ॥ ईश्वरास भावें भजून । योग्य शक्य काम
करून ॥ आकर्षावा जगज्जीवन । मगतो मुक्ति देतसे ॥ १७ ॥
गणपति किंवा शंकर । श्रीविष्णु देवी वा भास्कर ॥ कोणालाही
भजा हो नर । सर्व स्वरूप मानून ॥ १८ ॥ द्वेष कोणाचा न
करावा । सदा सन्मार्ग चालवावा ॥ असा जाणा मार्ग धरावा ।
ईश्वरासी स्मरून ॥ १९ ॥ देव जरीं प्रसन्न होई । तरी तयास
उणें कायी ॥ धन्य तयाचा जन्म होई । हेंच साधा सर्वजन ॥२०॥
देवकृपें सद्गुरु मिळे । त्यामुळें अज्ञान जळे ॥ ब्रह्मज्ञान आपणां

मिळे । हेंच संपूर्ण सार्थक ॥ २१ ॥ आणि हें मिळविण्यासाठीं । करावी सदा खटपटी ॥ याच जन्मीं न मिळे गति । तरी त्या मार्गास लागला ॥ २२ ॥ जरी संकट काल आला । तरी न सोडावें भक्ताला ॥ दृढभाव देवीं जडला । मग ईश्वर धांवेल ॥२३॥ आणि सद्गुरु दयाघन । कृपा करील जाणा पूर्ण ॥ मग होई स्वरूप ज्ञान । मुक्तचि झाला जाणा तो ॥ २४ ॥ देह ह्मणजे वस्त्रापरी । जिवाचे देह किती तरी ॥ मुक्त होईल जन्मांतरीं । याच जन्मीं जरी न साधे ॥ २५ ॥ परंतु जो न करी यत्न । त्यासी नाहीं स्वरूप ज्ञान ॥ कल्पांत काळ झाला जाण । तरी त्याला न मुक्ती ॥ २६ ॥ त्याचा जन्म मरण फेरा । होत जातसे दृढतरा ॥ तसे कष्टादिक अपारा । तो भोगितो सदोदित ॥ २७॥ अनंत जन्म त्याचे होती । परी त्याला न मिळे गति ॥ तरी

जनहो धर्मरीतीं । आचरून व्हा मुक्त ॥ २८ ॥ नरजन्मा शिवाय मुक्ति । नाहीं मिळत ठेवा चित्तीं ॥ जे जे पुरुष मुक्त होती । त्यांना ह्मणावे सद्गुरु ॥ २९ ॥ सद्गुरुनाथ दत्तात्रेय । सदा असती ते अक्षय ॥ सगुण निर्गुण अद्वितीय । भक्तांस कृपा सिंधु जे ॥ ३० ॥ ब्रह्मस्वरूपा दत्तात्रेया । नमन असो तव पायां ॥ मार्ग दावावा दीनास या । सर्वांस पाळा प्रेमानें ॥ ३१ ॥ तुमचीं आज्ञा तुह्मीं पुरी । करून घ्यावी लवकरी ॥ मग ते ह्मणती सत्वरी । तथास्तु असें कृपेनें ॥ ३२ ॥ जें असे नामरूपातीत । अविनाशी पूर्ण अनंत ॥ त्यासी समजावया येथ । ब्रह्म ह्मणती जाणते ॥ ३३ ॥ तें अनिर्वाच्य परब्रह्म । माया तेंच त्याचें स्फुरण ॥ ब्रम्हा विष्णु महेश जाण । हे सर्व दत्तस्वरूप ॥ ३४ ॥ सगुण निर्गुण श्रीदत्त । असती सर्वदा अनंत ॥ लोकाचारें प्रकट होत ।

कथा वर्णू सुख व्हाया ॥ ३५ ॥ ब्रह्म देवाचा पुत्र आत्रि । विचार
करी मनामती ॥ प्रवृत्ति सहित निवृत्ति । साधणारा पुत्र हवा
॥ ३६ ॥ असा पुत्र मिळविण्यास । तप करी तो अति विशेष ॥
जो कारण या विश्वास । त्याचा प्रसाद व्हावया ॥ ३७ ॥
त्या ऋषीचें तप पाहून । ब्रह्मा विष्णू महेश तीन ॥ उभे ठेले
पुढ्यांत जाण । आत्रि ऋषीच्या त्यावेळीं ॥ ३८ ॥ माग ह्मणती
वरदान । आह्मीं तीनही एक जाण ॥ जरी देह दिसती तीन ।
तरी एक हें ठेव मनीं ॥ ३९ ॥ ऋषि सांगे आपला हेतू ।
ते देव ह्मणती तथास्तु ॥ ऋषि आनंदला बहुत । कार्य साधलें
ह्मणोनी ॥ ४० ॥ नंतर त्या आत्रि ऋषीस । ते देव देती
दर्शनास ॥ तीन देव एकरूपास । दत्त नांवानें अक्षय ॥ ४१ ॥
तीन शिरें व सहा हात । या स्वरूपा नांव श्रीदत्त ॥ दत्तरूपें

घेती अनंत । परी हें मुख्य रूप हो ॥ ४२ ॥ त्रिगुणी व त्रिगुणातीत । माया ब्रह्मरूप श्रीदत्त ॥ त्यासी नसे कधींही अंत । भूत भविष्य वर्तमानीं ॥ ४३ ॥ पूर्वीपासून आजवर । तारिती जीव निरंतर ॥ शांडिल्यादि ऋषि अपार । सहस्रार्जुनादिक राजे ॥ ४४ ॥ नवनाथ जे योगेश्वर । त्यांचेही हेच गुरुवर ॥ त्या दत्तात्रेयां नमस्कार । असो आमुचा सद्भावें ॥ ४५ ॥ ज्ञानेश्वरादि एकनाथ । आणि रामदास समर्थ ॥ तुकारामादि साधुसंत । वगैरे पुष्कळ जाणा ॥ ४६ ॥ दत्तांचे वा दत्त शिष्यांचे । शिष्य असती जाणा साचे ॥ त्या सद्गुरु दत्तपदांचे । दास व्हावें सर्वांनीं ॥ ४७ ॥ दत्तलीला जाणा अनंत । थोड्याशा लिहूं या ग्रंथांत ॥ त्या योगानें श्रीगुरुदत्त । धन्य करोत सर्वांना ॥ ४८ ॥ अत्रि ऋषींस झाले पुत्र । दुर्वास चंद्र आणि दत्त ॥

ब्रह्मा विष्णु महेश सत्य । आपुल्या अंशें जन्म घेती ॥ ४९ ॥ दुर्वास ऋषि असे शिव । चंद्र तो जाणा ब्रह्मदेव ॥ विष्णु अंशास दत्त नांव । अत्रि अनसूयेचे पुत्र हे ॥ ५० ॥ चंद्र गेला चंद्र मंडळीं । दुर्वास फिरे महीतळीं ॥ उद्धराया भक्त मंडळी । आणि करण्या तपाला ॥ ५१ ॥ दुर्वासाच्या प्रसादामुळें । पांडवांचे जन्म जहाले ॥ ते उत्तम पुरुष भले । वंद्य सदा सर्वांना ॥ ५२ ॥ असो श्री महाविष्णु दत्त । आईबापापाशीं रहात ॥ सदा करिती लीला अनंत । आणि तोषविती पितरांला ॥ ५३ ॥ ते लग्न करून न घेती । सदा त्यांची आनंद वृत्ती ॥ श्रीदत्तात्रेय त्रयमूर्ती । त्यांचेंच रूप हे दत्त ॥ ५४ ॥ तीर्थ यात्रादि आचरिती । साधुसंतास ज्ञान देती ॥ गुप्त प्रकट त्यांची स्थिति । अंत न लागे कोणाला ॥ ५५ ॥ कोठें केव्हां प्रकट होती । कोणाची

परीक्षा कशी घेती ॥ हें नकळे कवणाप्रती । आजवरी अभंग ॥ ५६ ॥ आत्रि वरद दत्तात्रेय । विष्णु अंशांत अंशें जाय ॥ श्रीदत्तप्रभु अद्वितीय । त्यांसी नमन प्रेमानें ॥ ५७ ॥ पिंगल नांवाच्या सर्पास । श्रीदत्त देती उपदेश ॥ आणि खूप ऋषि-वरांस । ब्रह्मरूपीं मिळविले ॥ ५८ ॥ सहस्त्रार्जुन या राजास । श्रीदत्त प्रसन्न विशेष ॥ सर्व म्हणती त्या राजास । हा भक्ति दत्त असे ॥ ५९ ॥ विष्णूचा सहावा अवतार । परशुराम विप्र वीर ॥ दत्त कृपें झाला अमर । चिपळुणांत तपकरी ॥ ६० ॥ यदु अलर्कादि प्रल्हाद । दत्तकृपें जाहले सिद्ध ॥ दत्तात्रेय पर-मानंद । देई अक्षय सर्वदा ॥ ६१ ॥ पूर्वीचे नव योगेश्वर । ते झाले नवनाथ थोर । त्यांचा पराक्रम प्रखर ॥ अति अतर्क्यचि जाणा ॥ ६२ ॥ मत्स्येंद्रनाथ गोरखनाथ । जालिंदर कानिफनाथ ॥

नाग रेवणचर्पटनाथ । आणि गहिनीभर्तरी ॥ ६३ ॥ देवादि-
कांसही अजिक्य । ते हे नाथ श्रीदत्त शिष्य ॥ नाथ मंत्र बळी
विशेष । लोक दुःखें हरती ते ॥ ६४ ॥ दत्तात्रेय रहाती गुप्त ।
दिव्य भक्तां दर्शन देत ॥ आणि करिती त्यांना मुक्त । सर्व
समर्थ ते जाणा ॥ ६५ ॥ जो ब्रह्मांडें घडी व मोडी । त्याची
मृत्यु लोकांत प्रौढी ॥ वार्णितां जरी लागे गोडी । तरी तें वर्णन
अत्यल्प ॥ ६६ ॥ परी त्याच्या कांहींशा लीळा । लिहितो वंदुनी
तयाला ॥ वेद धर्म उत्तम भला । निसर्ग धर्म तो असे ॥ ६७ ॥
त्याचें रक्षण ईश्वर । करीतसे वारंवार ॥ घेऊन स्वयें अवतार ।
किंवा अन्य प्रकारें ॥ ६८ ॥ भगवद्भक्त थोरथोर । करिती सदा
जनोद्धार ॥ त्यांचा असे आधार । जगदीश्वर सर्वदा ॥ ६९ ॥
हिंदुस्थान यवनमय । व्यावयाचा आला समय ॥ तेव्हां श्रीगुरु

दत्तात्रेय । अवतरले या भूवरी ॥ ७० ॥ ते श्रीपाद श्रीवल्लभ थोर । ज्याचें स्थान कुरवपूर ॥ अजून भक्तांस आधार । वाटतसे तयांचा ॥ ७१ ॥ पीठापूर पूर्व देशीं । अवतरले विप्रवंशीं ॥ मौंजिबंधन समयासी । वेदादिक ह्मणती ते ॥ ७२ ॥ ऋद्धि सिद्धी तयाच्या दासी । सरस्वती असे वाचेसी ॥ त्या बटुरूपी दत्तासी । पाहुनी लोक तोषले ॥ ७३ ॥ भारतीं श्रीपाद फिरती । कुरवपुरीं मग रहाती ॥ लोकांलागीं संरक्षिती । अमोघ कृपा तयांची ॥ ७४ ॥ जनांस वाटे आधार । हा देवाचा अवतार ॥ आणि त्याच्या बोधानुसार । वागती जन निश्चयें ॥ ७५ ॥ आपापलें करावें काम । देवास सर्वदा भजून ॥ मग सुख समा– धान । येथें आणि मेल्यावर ॥ ७६ ॥ आपला धर्म पाळावा । दुसऱ्याचा कधीं न घ्यावा ॥ जरी तो वाटला बरवा । तरी

त्यासी न मुकावें ॥ ७७ ॥ आपल्या धर्मानें कल्याण । आपलें उत्तम होई जाण ॥ देव दयाळु भगवान । करितो क्षेम सर्वांचें ॥ ७८ ॥ आचार आणि व्यवहार । प्रायश्चित्तही हा कुमार ॥ सांगुनी जाणा निरंतर । जन सन्मार्गा लावले ॥ ७९ ॥ पांगळ्यांसी चालविले । आंधळ्यांस डोळे दिले ॥ निपुत्रिकां पुत्र झाले । श्रीपादांच्या कृपेनें ॥ ८० ॥ गरीब होती श्रीमंत । मूर्ख होती प्रज्ञावंत ॥ ज्ञानामृतें देवभक्त । झाले तृप्त त्यावेळीं ॥ ८१ ॥ यावनी राज्याचें संकट । वेद धर्मा मरणांतक ॥ परी श्रीपादकृपें देख । त्यासी जीवन मिळालें ॥ ८२ ॥ श्रीपाद करिती नवल । वैदुरापुरीं म्लेंच्छ नृपाळ ॥ त्याच्या पोटीं तयेवेळ । आपल्या भक्ता जन्म दिला ॥ ८३ ॥ तो भक्त परीट होता । श्रीपाद भक्त सर्वथा ॥ म्लेंच्छ राजकुळीं जन्मतां । पुढें झाला तो राजा ॥ ८४ ॥

त्याची होती समान दृष्टी । हिंदु लोकांची प्रीती मोठी ॥ श्रीपादांची दूर दृष्टी । विचित्र आणि अतर्क्य ॥ ८५ ॥ भक्तास दिला म्लेंच्छ जन्म । त्याच्या करवीं सर्व जन ॥ पाळवी तो पुत्राप्रमाण । तेणें जगला हा धर्म ॥ ८६ ॥ असो श्रीपाद गुप्त होती । जाणा कुरवपुरा प्रती ॥ दुसरा अवतार घेती । करंज नगरीं वऱ्हाडीं ॥ ८७ ॥ जन्मापासून प्रणवोच्चारी । जाणा हा बाळ नरहरी ॥ लोखंडाचें सुवर्ण करी । कृपा दृष्टीनें पाहतां ॥ ८८ ॥ मौंजी बंधनानंतर । वेदादिक ह्मणे कुमार ॥ आश्चर्य करिती नारीनर । धन्य धन्य ह्मणती ते ॥ ८९ ॥ जे मोठमोठे विद्वज्जन । तेही प्रार्थिती नमून ॥ आह्मा लागीं कृपा करून । विद्यामृत पाजावें ॥ ९० ॥ त्यांसी शिकवी नरहरी । त्याची तुलना कोण करी ॥ एकवर्ष यापरी घरीं । बाळ राहिला त्यावेळीं ॥ ९१ ॥

मग निघाला तिर्थाटना । मनोवेगें मार्गक्रमणा ॥ करी बाळ सर्वदा जाणा । त्याची लीला अतुल्य ॥ ९२ ॥ काशीस पातला हा बाळ । करी त्रिकाळ आंघोळ ॥ अष्टांगयोग आचरी बाळ । जन विस्मित जाहले ॥ ९३ ॥ यतींच्या आग्रहावरून । बाळ संन्यास घेऊन ॥ करी नानाठायीं गमन । भक्त जनां सुखवाया ॥ ९४ ॥ दिव्य बाळक वेषयती । नांव नृसिंह सरस्वती ॥ स्वधर्म प्रीती वाढविती । नाना ठिकाणीं लोकांची ॥ ९५ ॥ करिती लीला विलक्षण । दत्तावतारी हे पूर्ण ॥ त्यांची लीला मी अपूर्ण । पूर्णपणें लिहूं कशी ॥ ९६ ॥ काशी हरिद्वार केदार । हिमालय व मेरूवर ॥ फिरूनी येती गुरुवर । श्री नृसिंह सरस्वती ॥ ९७ ॥ करंज नगरीं पातले । संगें होते शिष्य भले ॥ माता पिता बंधू सगळे । व ग्राम लोकादि तोषती ॥ ९८ ॥

गुरूला भिक्षा करविती । गुरु खूप रूपें धरिती ॥ प्रत्येकाच्या घरीं घेती । एकाच वेळीं ते भिक्षा ॥ ९९ ॥ सर्वांस दिला आशिर्वाद । लोक जाहले सगद्गद ॥ सर्वांचा आनंद समुद्र । उचंबळून आला असे ॥ १०० ॥ मग श्रीगुरु अन्य ठायीं । भक्तोद्धार कराया पाहीं ॥ निघाले त्यांसी लवलाहीं । नमन भावें करूया हो ॥ १०१ ॥ नाशिक ब्रह्मेश्वरादि तीर्थें । आचरिलीं श्रीगुरुनाथें ॥ तिकडे एका ब्राह्मणातें । यवनापासून रक्षिला ॥ १०२ ॥ आणि एकाचा पोटशूळ । घालवी पाहतां तत्काळ ॥ श्रीगुरुदत्त फार दयाळ । त्यांसी अशक्य कायसें ॥ १०३ ॥ पुढें गेले वैजनाथास । तारिले लोक बहुवस ॥ मग आले भिल्लवडीस । सिद्धस्थान गहन तें ॥ १०४ ॥ मूर्खास दिलें वेदज्ञान । आणखीही लीला करून ॥ वरुणा संगमा जाऊन । मग गेले अमरेश्वरा ॥ १०५ ॥

भिल्लवडीस भुवनेश्वरी । पश्चिमभागीं नरहरी ॥ राहिला असे
औदुंबरीं । घनदाट छायेंत ॥ १०६ ॥ कृष्णा नदी तेथें असे ।
उत्तम क्षेत्र हें असे ॥ भक्त इच्छा पुरवीतसे । औदुंबरीं श्रीदत्तगुरु ॥
॥ १०७ ॥ अमरेश्वर दिव्यस्थान । कृष्णा पंचगंगा संगम ॥
बारा वर्षें तेथ राहून । दिव्य क्षेत्र तें केलें ॥ १०८ ॥ दरिद्री
लोकां द्रव्य दिलें । योगिनींसही तोषविलें ॥ भूतादिकास
घालविलें । वांझेस पुत्र जाहले ॥ १०९ ॥ दिव्य तीर्थें येथें उत्तम ।
नरसोबावाडी क्षेत्र नाम ॥ जनांत प्रसिद्ध परम । हें क्षेत्र असे
हो ॥ ११० ॥ अमरेश्वर पूर्वभागीं । गुरुस्थळ पश्चिम भागीं ॥
कृष्णा नदी मध्यभागीं । असें स्थान हें असे ॥ १११ ॥ येथ
अमित भक्त येती । त्यांचे मनोरथ पुरती ॥ यथाचारें करावी
भक्ती । मग श्रीगुरु प्रसन्न ॥ ११२ ॥ येथून जवळ शिरोळ ।

पेज प्याले तें ॥ ११३ ॥ नृसिंहवाडीस राहून । मग केलें पुढें गमन ॥
गाणगापूर दिव्य स्थान । भीमा अमरजा संगमीं ॥ ११४ ॥
पूर्वीची असे यज्ञभूमी । तेथें राहिले गुरुस्वामी ॥ तेणें क्षेत्र उत्तम
नामीं । गाणगापूर झालें असे ॥ ११५ ॥ तेथें असंख्य गुरुलीला ।
जनोद्धारासाठीं जाहल्या ॥ दत्तांस भक्त कळवळा । करी कल्याण
तयांचें ॥ ११६ ॥ वांझ म्हैसही दूध देई । ब्रह्मराक्षस गति घेई ॥
सुभक्त विश्वरूप पाही । होई ऐक्य ईश्वरीं ॥ ११७ ॥ मत्त पंडित
भ्रांत झाले । मांगास विप्रज्ञान दिलें ॥ प्रेतास पुन्हां प्राण आले ।
शुष्ककाष्ठ वृक्ष झाला ॥ ११८ ॥ अल्प अन्न खूप जहालें । वृद्ध
वांझेस झालीं मुलें ॥ कुष्ठादि रोग तये वेळ । क्षणांत जाती पळून
॥ ११९ ॥ थोडें शेत पिके अपार । अष्टरूपीं झाले गुरुवर ॥

आणखीही लीला अपार ॥ जाहल्या भक्त कल्याणा ॥ १२० ॥
म्लेंच्छ कुळांत राजा झाला । श्रीपाद भक्त धोबी भला ॥ त्याला
स्फोटक उद्भवला । वृद्धपणीं मांडीवर ॥ १२१ ॥ तो गुरुचरणीं
पातला । ऐकून गुरु महात्म्याला ॥ गुरु म्हणती त्या राजाला ।
सुखी अससीना रजका ॥ १२२ ॥ फोड तत्काळ बरा झांलां ।
पूर्व जन्म ज्ञान राजाला ॥ झालें मग ह्मणूं लागला । गुरुराया
मी तव भक्त ॥ १२३ ॥ प्रार्थी गुरुला वारंवार । ह्मणे देवा मी
तव किंकर ॥ आतां होईन अनुचर । श्रीगुरुराया आपुला
॥ १२४ ॥ घेऊन गेला श्रीगुरुसी । यवन राजा स्वराज्यासी ॥
गुरु जाती राजभक्तीसी । वैदुरापुरीं त्यावेळीं ॥ १२५ ॥ गुरुला
राजा सिंहासनीं । बसवी तेव्हां आनंदोनी ॥ मग येती श्रीगुरु–
मुनी । पुन्हां गाणगापुराला ॥ १२६ ॥ जरी झाला यवनराजा ।

तरी करी ब्राह्मण पूजा ॥ हिंदु धर्म रक्षण काजा । अवतार झाला दत्ताचा ॥ १२७ ॥ असो गुरु गाणगापुरीं । असतां झाले प्रसिद्ध फारी ॥ मग ते दत्त नरहरी । श्रीनृसिंह सरस्वती ॥ १२८ ॥ विचार करिती मनांत । आतां रहावें आपण गुप्त ॥ मग लोकां सांगती मात । आह्मीं आतां गुप्त होतों ॥ १२९ ॥ जरी गुप्तपणें राहिलों । तरी येथून नाहीं गेलों ॥ जरी तुह्मां तसा भासलों । तरी आहे पूर्ववत ॥ १३० ॥ अनुभव येत राहील । लोकांस वाटे हळहळ ॥ गुरुपदीं प्रेम विमल । त्या योगानें त्यावेळीं ॥ १३१ ॥ गुरु निघाले श्री शैल्यासी । गुप्त ठेले गाण–गापुरासीं ॥ प्रत्यय येती त्या स्थानासी । आजवरी अभंग ॥ १३२ ॥ शैल्य पर्वतीं गुरु राहिले । परत ते गुप्त जहाले ॥ पुन्हां मग प्रगट झाले । हिमालय पर्वतीं ॥ १३३ ॥ तेथें वाघ

व हरिणांस । गुरु देती ज्ञान विशेष ॥ वाघ यति व तपस्व्यांस ।
देती त्रैमूर्ति दर्शन ॥ १३४ ॥ चिनी पुरुष आणि व्याध ।
त्यांनाही गुरु झाले सुखद ॥ श्रीदत्त नरहरी सिद्ध । श्रीनृसिंह
सरस्वती ॥ १३५ ॥ त्यांना करूंया नमस्कार । सर्व भारतीं
गुरुवर ॥ किंबहुना सर्व भूवर । असती ते सदैवही ॥ १३६ ॥
या भारत देशांत । गुरुनाथ होते फिरत ॥ उद्धरले भक्त अनंत ।
आजवरी अखंड ॥ १३७ ॥ गुरुनाथ नर देहानें । फिरले सदा
नाना स्थानें ॥ परी गुप्त वा प्रकटपणें । भक्तांस सर्वत्र तारिती
॥ १३८ ॥ काशी क्षेत्र व हरिद्वार । तसेंच बंगाल काश्मीर ॥
जगन्नाथ व रामेश्वर । गिरनार द्वारका ॥ १३९ ॥ राजूर पंढरपूर ।
नेपाळ व सोलापूर ॥ मंगळवेढें प्रज्ञापूर । वगैरे विविध स्थानीं
॥ १४० ॥ कर्नाटक व कोंकण । तसेच अन्य स्थानीं जाण ॥

श्रीगुरूनीं केलें भ्रमण । आणि भक्तां सुख दिलें ॥ १४१ ॥
कुष्टादि रोग पळाले । आंधळे पाहूं लागले ॥ पांगळेही चालूं
लागले । मुकाही बोले तत्काळ ॥ १४२ ॥ मातीची उत्तम चांदी
होइ । साप व हाडांचें सोनें होई ॥ उन्मत्त हत्ती शांत होई ।
मेला उंदीर जिवंत ॥ १४३ ॥ शत वर्षांच्या जोडप्यास । पुत्र
होई त्यावेळेस ॥ उदक नसे त्या स्थानास । पाणी सहज
वाढतसे ॥ १४४ ॥ समुद्रीं मोठ्या वादळांत । बुडालीं जहाजें
तरत ॥ विविध व्याधि नष्ट होत । श्रीगुरुकृपा प्रसादें ॥ १४५ ॥
भूत भविष्य वर्तमान । गुरुमुखें ऐकती जन ॥ सर्वांस क्षेम समा–
धान । देती श्रीगुरु सदैव ॥ १४६ ॥ माणिक प्रभु दत्तावतारी ।
तेही झाले प्रसिद्ध फारी ॥ ते रहाती माणिक नगरीं । नवीन
स्थान स्थापिलें ॥ १४७ ॥ त्यांच्याही असंख्य लीला । भक्त

सुखासाठीं झाल्या ॥ नमस्कार असे तयांला । धन्य धन्य ते असती ॥ १४८ ॥ दत्ताचे मुख्य अवतार । वर्णन केले येथवर ॥ अन्यही खूप अवतार । धरिती दत्त सर्वदा ॥ १४९ ॥ गृहस्थ यति ब्रह्मचारी । वगैरे अवतार फारी ॥ श्रीदत्ताचे या भूवरी । अंशें झाले लोकसुखा ॥ १५० ॥ तत्त्व कदाही न सोडून । काला-नुसार आचरण ॥ शक्य योग्य सदा करून । देवास भजा शुद्ध मनें ॥ १५१ ॥ आपापला धर्म पाळून । सकळांशीं प्रेम धरून ॥ जसे देहावयव जाण । तशा वर्तनें देव मिळे ॥ १५२ ॥ यापरी शिक्षण ते देती । सर्व धर्माचे लोक भजती ॥ श्रीदत्तांना त्यांचीही प्रीती । पुरविती सद्भक्तवासना ॥ १५३ ॥ शुद्ध मन सदा ठेवून । श्रीगुरुसी भजा जाण ॥ इहपरही समाधान । अंतीं मिळे सायुज्यता ॥ १५४ ॥ असा दत्तांचा आशिर्वाद । सद्भक्तांना

सदा सुखद ॥ तसे वागून भक्त उद्दंड । तरती जाणा सर्वदा ॥ १५५ ॥ दृष्टांत वा अन्य प्रकारें । दत्तात्रेय सांगती सारें ॥ निष्ठा ठेवितां होई बरें । काळाचाही भय नाहीं ॥ १५६ ॥ स्वप्नांत किंवा प्रत्यक्षही । दत्तात्रेय दर्शन देई ॥ सर्वांवरही माया ठेवी । भजे त्यावर विशेष ॥ १५७ ॥ नानाविध साधु संत । दत्तकृपें प्रसिद्ध होत ॥ कांहीं लिहूं या ग्रंथांत । नमन असो तयांसी ॥ १५८ ॥ सिद्ध आणि नामधारक । श्री जनार्दन भक्त देख ॥ तयांचा शिष्य एकनाथ । गुरुभक्त दासोपंतही ॥ १५९ ॥ श्रीसमर्थ रामदास । ब्रह्मानंद बुवा विशेष ॥ सदानंदादि दत्तदास । वगैरे अमित जाहले ॥ १६० ॥ कोल्हापुरीं कुंभार स्वामी । देव मामलेदार नामी ॥ नृसिंह सरस्वती स्वामी । आळंदीस वास ज्यांचा ॥ १६१ ॥ वासुदेवानंद सरस्वती ।

वामनबुवा बडोद्यामती ॥ केडगांवची सद्भक्तमूर्ती । श्री नारायण महाराज ॥ १६२ ॥ साटमबुवा दाणोलीस । यापरी साधुसंत बहुवस ॥ वाढविती भक्ती मार्गास । श्रीगुरुकृपें करोनी ॥ १६३ ॥ खूप झाले सद्भक्तसंत । अगदींच थोडे या ग्रंथांत ॥ लिहिले स्मरूनी श्रीदत्त । परी उरले अनंत हो ॥ १६४ ॥ त्या सर्वांस नमस्कार । आमुचा असो वारंवार ॥ दत्तात्रेय श्रीगुरुवर । करो कल्याण सर्वांचें ॥ १६५ ॥ जसा देह असे आपला । नाना इंद्रियांनीं सांधला ॥ तीच अवस्था समाजाला । विसरूं नये कोणीही ॥ १६६ ॥ हात करी आपलें काम । पाय करी आपलें काम ॥ डोकें करी आपलें काम । स्वकाम करी पोटही ॥ १६७ ॥ एकमेकां प्रेम धरून । काम करिती इंद्रियें जाण ॥ तसें स्वकाम आपण । करून रहावें समाजीं ॥ १६८ ॥ आणि

व्हाया मोक्ष साधन । तोंवरी इहपर समाधान ॥ श्रीगुरुदत्त भक्ति जाण । दृढ शुद्ध मनें करावी ॥ १६९ ॥ कसाही बिकट प्रसंग । निवारी दत्त यथासांग ॥ आपला भाव दृढ चांग । ठेवावा नित्य अखंड ॥ १७० ॥ वेदधर्म हा चिरजीव । सुखी करी संपूर्ण जीव ॥ ज्याचा रक्षणकर्ता देव । तया नमन सद्भावें ॥ १७१ ॥ यवनमय हिंदुस्थान । होण्याचा वेळ आला जाण ॥ तेव्हां दत्तें कृपा करून । रामदासा समर्थ केलें ॥ १७२ ॥ शिवाजी राजे त्यांचे शिष्य । रामदास हे श्रीदत्त शिष्य ॥ ईश्वरें ही जोडी अवश्य । दाउनि धर्म रक्षिला ॥ १७३ ॥ श्री आद्य-शंकराचार्यांस । वर देती दत्त विशेष ॥ त्यामुळें वेद धर्मास । आचार्य जीवन घालिती ॥ १७४ । जो करी धर्माचें पालन । त्याचें धर्म करी रक्षण ॥ इहपर तो सखा जाण । अंतीं मिळे

पूर्ण सुख ॥ १७५ ॥ वेद धर्माचा वाली जाण । ईश्वर स्वयंसिद्ध पूर्ण ॥ त्या धर्माचें सदा रक्षण । ईश्वर करी पुनः पुनः ॥ १७६ ॥ प्रत्येकाचें कर्तव्य जाण । करणें स्वधर्म पाळून ॥ गुरुदेव कृपा मिळवून । करणें कर्म उत्तम ॥ १७७ ॥ एकच नाहीं हा भूलोक । जगें असती विविध देख ॥ तरी येथें वागुनी चोख । मिळविणें सुख सत्य जें ॥ १७८ ॥ हाच आमचा असे धर्म । तरी पाळुनी आपला धर्म ॥ सर्वांचेंही करुनि क्षेम । जावें खऱ्या सुखाला ॥ १७९ ॥ सर्व स्वरूपी दत्तगुरु । जागृत जाणा हे फारु ॥ तयां करूया नमस्कारु । मग ते कृपा करतील ॥ १८० ॥ कोणाचा पाठीराखा कोण । कधीं नाहीं सद्गुरुवीण ॥ ते गुरुदत्त दयाघन । नमन त्यांसी सद्भावें ॥ १८१ ॥ अनंत जन्म झाले गेले । त्यांत हा जन्म तूर्त मिळे ॥ मुक्त व्हाया साधन भलें ।

दिलासे हा नरदेह ॥ १८२ ॥ सद्गुरु कृपा मिळवून । आपण व्हावें आतां धन्य ॥ जरी मध्यें येई मरण । तरी गुरु न सोडिती ॥ १८३ ॥ जन्मांतरींही दत्तगुरु । तारिती जाणा खरोखरु ॥ अनमान येथें नको धरूं । बा हे नरजीवा तूं ॥ १८४ ॥ सुख दुःखादि येती जाती । स्थीर कधीं ती न राहती ॥ सदा पाठि-राखा निश्चितीं । असे आपला सद्गुरु ॥ १८५ ॥ त्या सद्गुरु दत्तात्रेयाची । भक्ति करा बरवी साची ॥ मग तुम्हांस प्रचिती त्याची । सर्वदा येत राहील ॥ १८६ ॥ जगीं नाना प्रसंग असती । गुरुभक्तां ते सोपे जाती ॥ दृढ करावी गुरुभक्ति । आणि सुख मिळवावें ॥ १८७ ॥ स्वधर्म जिवंत राहील । असें करा काम विमल ॥ मग श्रीगुरु सर्व काळ । असे तुमचा पाठिराखा ॥ १८८ ॥ अधर्मानें सुख मिळेल । परंतु तें अल्पचि

काळ ॥ दुःखादि मग जाणा विपुल । भोगतां भोगतां न संपती ॥ १८९ ॥ तरी जनहो एक विनंति । भावें दृढ श्रीगुरु भक्ती ॥ केल्या मग दत्त सांगती । केव्हां कसें वागावें ॥ १९० ॥ तसेंच नंतर वागावें । मग क्षेम होई बरवें ॥ अंतीं शाश्वत पदा जावें । श्रीगुरुकृपें सुखानें ॥ १९१ ॥ सर्वांचेंही सुख चिंतावें । शुद्ध मनें सदा वागावें ॥ माहित असे त्यांत करावें । योग्य आणि शक्य तें ॥ १९२ ॥ आणि करावी गुरुभक्ती । मग येतसे प्रचीती ॥ भक्तानुभव हे असतां । नाहींच खोटें होणार ॥ १९३ ॥ आपलीं दुःखें हरतील । श्रीगुरु सुखादि देईल ॥ ही स्तुति भावें वाचील । दत्ताशिर्वाद असे त्या ॥ १९४ ॥ सर्वांनीं श्रवण पठण । करावी ही स्तुति जाण ॥ श्रीदत्ताच्या आज्ञेवरून । विष्णु गोपाळ लिही ही ॥ १९५ ॥ त्याची स्तुति अर्पण त्यांला ।

दत्तगुरु सुख द्या सर्वांला ॥ विनंती नम्र तव पदांला । करीं संप्रेमें अवधूत ॥ १९६ ॥ श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु ॥

समाप्त.

## श्री. वल्लभ गोविंद नातू

मो. : ९९२३८००९१२

फ्लॅट नं. २०१, छबाई अपार्टमेंट,
४११, शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

## श्री. विठ्ठल गोविंद नातू


मो. : ९५३७६२३५२३

फ्लॅट नं. ३, श्रीनाथजी रेसिडन्सी,
दत्तश्री बंगल्याशेजारी, वॉटर टँक समोर,
चेतना नगर, नाशिक, ४२२००२.

## श्री. दत्तात्रय अनंत काळे

मो. : ९८२२८७१५५४

सी. ६०५, व्यंकटेश शर्विल, पारी कंपनी
समोर, धायरी, पुणे ४११०४१



मुळ प्रतीचे मलपृष्ठ...

### जन्मपात्रिका.

शुद्ध व सूक्ष्म गणिताप्रमाणें पत्रिका करून घेणें प्रत्येकास आवश्यक असतें. तशी ३ रुपये पाठवून स्पष्ट ग्रह, भावचलित कुंडली, महादशा, अंतर्दशा व इतरहीं जरुरीची विशेष माहिती दिलेली पत्रिका जवळ ठेवा. लहान पत्रिका ।, ॥, १, १॥, व २ रुपये. व्ही. पी. नाहीं. जन्मकाल, जन्मस्थळ व पत्ता स्पष्ट कळवा.

---

विष्णु गोपाळ नातू मु० पो०—आजगांव. ( सावंतवाडी )

तूर्तचा पत्ता—वि० गो० नातू C/o वे० रा० वासुदेव नरहर पूजारी,
नरसोबावाडी. व्हाया जयसिंगपूर. M. S. M.

---

हे दत्तात्रेय स्तोत्र शंकर माधव परुळेकर यानीं " बेळगांव समाचार "
छापखान्यांत छापिलें व विष्णु गोपाळ नातु, मु० आजगांव

## श्री. माणिक अनंत काळे

मो. : ९०९६०८२२७२

फ्लॅट नं. १२, मंगलमूर्ती पार्क, सुदर नगरी समोर,
कोथरुड, पुणे ४११०३८.

ग्राफिक्स, टाईपसेटिंग : ग्राफिटोन, पुणे.